## पुनरीक्षित निदेश क्रमांक १*　　　　　　　सभागृहाच्या कामकाजाचा पारस्पारिक प्राथम्यक्रम

दिनांक २७ जुलै, २००४ रोजी दिलेला निदेश क्रमांक १ रद्द करुन महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम ५६ च्या तरतुदींनुसार सभापतींनी खालील निदेश दिला आहे :-

कामकाजाचा पारस्पारिक प्राथम्यक्रम

सभापतींनी अन्यथा निदेश दिला नसेल तर, सभागृहासमोर असलेल्या व खाली निर्दिष्ट केलेल्या निरनिराळया प्रकारच्या कामांचा पारस्पारिक प्राथम्यक्रम पुढील क्रमवारीनुसार असेल :-

(एक) शपथ घेणे किंवा गांभीर्यपूर्वक दृढकथन करणे.
(दोन) मंत्र्यांचा परिचय
(तीन) "प्रश्नोत्तरे- (अल्पसूचना प्रश्न, राखून ठेवण्यात आलेले तारांकित प्रश्न, तारांकित प्रश्न, तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती, अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे इत्यादी प्रश्न विषयक बाबी)"
(चार) राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.
(पाच) राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.
(सहा) अभिनंदनपर प्रस्ताव.
(सात) शोक प्रस्ताव.
(आठ) अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.
(नऊ) सभागृहाच्या पटलावर ठेवावयाची कागदपत्रे.
(दहा) पुरवणी मागण्या सादर करणे.
(अकरा) अतिरीक्त मागण्या सादर करणे.
(बारा) राज्यपालांकडून आलेले संदेश कळविणे.
(तेरा) विधानसभेकडून आलेले संदेश कळविणे.
(चौदा) विधेयकांना राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाल्याबद्दलची सूचना.
(पंधरा) विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याबद्दलची सूचना.
(सोळा) सभागृहाच्या सदस्यांची अटक, स्थानबध्दता, किंवा सुटका, याबाबत दंडाधिकारी किंवा इतर प्राधिकाऱ्यांकडून आलेले संदेश.
(सतरा) विविध समित्यांचे अहवाल सादर करणे.
(अठरा) अशासकीय विधेयके व ठराव यासंबंधीच्या समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व त्यास संमती देण्याबाबतचा प्रस्ताव.
(एकोणीस) कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करणे व समितीच्या शिफारशी स्वीकृत करण्याबाबतचा प्रस्ताव.
(वीस) महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम १७६ अन्वये समितीपुढे सादर करण्यात आलेला पुरावा सभागृहाच्या पटलावर ठेवणे.
(एकवीस) विनंती-अर्ज सादर करणे.
(बावीस) विशेषाधिकार भंगाचे प्रश्न.
(तेवीस) नियम ९३ अन्वये सूचना.
(चोवीस) लक्षवेधी सूचना.
(पंचवीस) विशेष उल्लेख सूचना (नियम १०१ अ)
(सव्वीस) पुरवणी मागण्यांवर चर्चा.
(सत्तावीस) अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.
(अठ्ठावीस) अतिरिक्त मागण्यांवर चर्चा.
(एकोणतीस) सभागृहाच्या बैठकीस सदस्यांना अनुपस्थित राहण्याची परवानगी देण्यासंबंधीची सभापतींची घोषणा.
(तीस) सभागृहातील सदस्यांचे राजीनामे, सभापती-तालिकेवर नामनिर्देशन, समित्या, इत्यादींसारख्या विविध विषयासंबंधी सभापतींची घोषणा
(एकतीस) सभापतींनी दिलेले निर्णय किंवा केलेल्या घोषणा.
(बत्तीस) म.वि.प.नियम ४६ अन्वये मंत्री महोदयांचे निवदेन.
(तेहत्तीस) म.वि.प.नियम ४७ अन्वये सदस्यांचे वैयक्तिक निवेदन.
(चौत्तीस) माजी मंत्र्यांनी आपल्या राजीनाम्यांच्या स्पष्टीकरणार्थ केलेले वैयक्तिक निवेदन.
(पस्तीस) विधेयकासंबंधातील चिकित्सा/सयुक्त समितीचा व विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याकरिता मुदत वाढीसंबंधीचा प्रस्ताव.
(छत्तीस) सभापतींना/ उप सभापतींना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्याची परवानगी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव.
(सदतीस) अल्पकालीन चर्चा.(म.वि.प.नियम ९७ अन्वये)
(अडतीस) विशेष हक्क समितीच्या अहवालावर विचार करणे.
(एकोणचाळीस) शासकीय विधेयके व त्यावरील प्रस्ताव, वैधानिक प्रस्ताव, शासकीय ठराव
(चाळीस) अहवाल विचारात घेणे, अंतिम आठवडा प्रस्ताव, सार्वजनिक महत्वाच्या बाबींवरील प्रस्ताव इत्यादींवरील चर्चा
(एकेचाळीस) अशासकीय कामकाज- ठराव/ अशासकीय विधेयके
(बेचाळीस) अर्धा-तास चर्चा.

*********************